नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/03/2024 (मंगळवार) दुपार

---

## पोस्टे कळमेश्वर हददीतील मौजा गोंडखैरी पारधी बेडा व शिवार येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

मा. पोलीस अधिक्षक नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने आज दि. १२/०३/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखा ना. ग्रा. तसेच पोस्टे कळमेश्वर येथील अधिकारी व अंमलदार यांनी शासकीय वाहणाने पोस्टे कळमेश्वर हददीतील मौजा गोंडखैरी पारधी बेडा व शिवार येथे मोहाफुल गावठी दारू गाळणा—या इसमावर संयुक्तिकरीत्या कार्यवाही करण्यात आली. पोलीस महीला व पुरुष कर्मचारी स्टॉफसह रेड केली असता अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण १४ महिला आरोपी हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातून १) २४० लिटर मोहाफूल गावठी दारू ५० रू लिटर प्रमाणे किंमती ४८००/—रू. २) १०,३२० लिटर मोहाफूल सडवा रसायन कि. २० रु लिटर प्रमाणे २,०६,४००/—रू. ३) प्लास्टिक ड्रम व इतर साहित्य किमती ३७,८००/—रू असा एकुण किंमती २,४४,२००/— रू चा मुदेमाल जप्त करून एकुण १४ महिला आरोपीतांवर पोलिस स्टेशन कळमेश्वर येथे गुन्हे दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे. जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे कळमेश्वर यांचे ताब्यात देवून वरील आरोपीं विरूद्ध वेगवेगळे कलम ६५ फ, ब, ई म.दा.का अन्वये गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, मा अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग श्री. अनिल मस्के, सहा. पोलीस अधीक्षक, श्री. दिपक अग्रवाल यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनि. आशिषसिंग ठाकुर, दिपक कॉक्रेटवार, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, बट्टुलाल पांडे, स्थानिक गुन्हे शाखा ना. ग्रा. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील पोलीस उपनिरीक्षक मनोज टिपले, महिला पोलीस उपनिरीक्षक पल्लवी काकडे, आरसीपी पथक यांनी संयुक्तिकरीत्या पार पाडली.



## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण २,५४,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक ११/०३/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोस्टे खापरखेडा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, ट्रॅक्टर ट्रॉली द्वारे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून चनकापूर समशान घाटकडे जाणारा रोड चणकापूर सावनेर येथे नाकाबंदी करीत असताना एक महिंद्रा—५९५ कंपनीचे लाल रंगाचे ट्रॅक्टर क्र. एमएच—३१ एल ३०१८ व ट्रॉली क्र. एमएच—४० आय ४९२४ आढळुन आले. स्टाफने वाहनास थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती ब्रास रेती मिळून आल्याने सदर चालकास ट्रॅक्टर ट्रॉली मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून १) एक महिंद्रा—५९५ कंपनीचे लाल रंगाचे ट्रॅक्टर क्र. एमएच—३१ एल ३०१८ व ट्रॉली क्र. एमएच—४० आय ४९२४ किमती अंदाजे २,५०,०००/— रुपये. ०२) ट्रॉली मधील एक ब्रॉस रेती किंमती अंदाजे ४,०००/— रूपये. असा एकुण २,५४,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे—१) जावेद अहमद अन्सारी, वय ४२ वर्ष रा. वार्ड क्रमांक सहा चणकापुर** यांचेविरुद्ध पोस्टे खापरखेडा येथे कलम ३७९ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. खापरखेडा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, PSI बट्टूलाल पांडे ,ASI नाना राऊत, HC विनोद काळे, ईकबाल शेख, NPC संजय बरोदीया, PC निलेश इंगुलकर, चालक अभिनित सोनटक्के यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर